**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४, (महाराष्ट्र)**
PHONE : (EPABX) (0231) 2609000
दूरध्वनी-(ईपीएबीएक्स) (०२३१) २६०९०००
Vice-Chancellor's Office Phone No.– (0231) 2609060, 2609061
Fax No.– (0231) 2691533
Registrar Office Phone No.– (0231) 2609063, 2609057
Fax No.– (0231) 2692333
Meeting & Elections Section Phone No. – (0231) 2609129, 2609130
Email ID :- meeting@unishivaji.ac.in
NAAC 'A' Grade

निवडणूक तात्काळ

शिवाजी वि/सभा व निवडणूका/म.शिक्षक/ 3350 दिनांक: 21 JUL 2017

स्मरणपत्र क्र.- ३

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत/स्वायत्त महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,

विषय : अधिसभा/विद्यापरिषद निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करणेकरिता महाविद्यालयीन शिक्षकांची माहिती पाठविणेबाबत.

संदर्भ: १. एसयु/एमटीजी/कॉलेज टीचर/२१५८ दि.१५.०६.२०१७
२. शिवाजी वि/सभा व निवडणूका/२७०९ दि.०५/०७/२०१७ रोजीचे स्मरणपत्र
३. शिवाजी वि/सभा व निवडणूका/३०७८ दि.१४/०७/२०१७ रोजीचे स्मरणपत्र क्र.२

महोदय/महोदया,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ अन्वये अधिसभा व विद्यापरिषद या अधिकार मंडळांवर महाविद्यालयीन शिक्षक या संवर्गासाठी निवडणुक घेण्याकरिता मतदार यादी तयार करावयाची आहे. त्यासाठी उपरोक्त संदर्भीय पत्र क्र.१ नुसार महाविद्यालयीन शिक्षकांची माहिती ऑनलाईन भरणेबाबत व ती दि.३०.०६.२०१७ पर्यंत आवश्यक त्या कागदपत्रासह पाठविण्याबाबत ई-मेलद्वारे आपणास कळविण्यात आले होते. तसेच संदर्भ क्र.३ च्या स्मरणपत्रान्वये ज्या महाविद्यालयांनी सदर माहिती वेळेत पाठविली नाही त्यांनी ती दिनांक २०/०७/२०१७ पर्यंत पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. अशाप्रकारे दोन वेळा मुदतवाढ देऊनही अद्याप बऱ्यांच महाविद्यालयांकडून सदर शिक्षकांची माहीती प्राप्त झालेली नाही.

त्यास अनुसरून आदेशान्वये पुन:श्च कळविण्यात येत आहे की, ज्या महाविद्यालयांनी/मान्यताप्राप्त संस्थांनी सदरची माहिती अद्याप पाठविलेली नाही, त्यांनी वरील संदर्भीय पत्रांनुसार पूर्णवेळ नियमीत मान्यताप्राप्त शिक्षकांची माहिती ऑनलाईन भरून आवश्यक त्या कागदपत्रासह हार्डकॉपी स्वरूपात **दिनांक २४.०७.२०१७ पर्यंत अथवा तत्पूर्वी प्राध्यान्यक्रमाने विनाविलंब विद्यापीठात जमा करावी, ही विनंती.**

तसेच शिक्षकांची माहिती पाठविताना संबंधित शिक्षक सध्या ज्या महाविद्यालयात कार्यरत आहे, त्या महाविद्यालयातील त्यांची पूर्णवेळ नियमित मान्यताप्राप्त शिक्षक म्हणून मान्यता दिलेल्या मान्यता पत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव

**टिप- ज्या महाविद्यालयांनी उपरोक्त संदर्भीय पत्रास अनुसरून माहिती पाठविली असेल तर त्यांनी पुन्हा सदर माहिती पाठविण्याची आवश्यकता नाही.**